| |
|---|
| नि.फौ.ख.क्र. २१३२ /२०१५ |
| सरकार -वि- कुसूम राजू व ईतर |
| निशाणी क्र. २९ |

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांची शपथेवर सरतपासणी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | प्रज्ञा प्रकाश पाटील, |
| **वय** | : | ३६ वर्षे, |
| **धंदा** | : | महिला पोलीस शिपाई ब.क्र.३०८७ |
| **राहणार** | : | पो.स्टे. जरीपटका, नागपूर |

**सरकार पक्षातर्फे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती प्रियंका भा. झिरपे यांचेमार्फत-**

सन २०१५ मध्ये मी पोलीस मुख्यालय नागपूर येथे महिला पोलीस शिपाई म्हणून कार्यरत होते. दिनांक १७.०१.२०१५ रोजी माझी सकाळी ९.०० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत दिवसपाळी डयुटी होती. मी डयुटीवर हजर असतांना मला लकडगंज पोलीस स्टेशनच्या ए.सी.पी. पथकामध्ये पाठविले होते. सदर पथक हे गंगाजमुना परिसरात पेट्रोलीगसाठी नेमणूकीस होते. सदर पथकामध्ये म.पो.शि. रश्मी ब.क्र.२७८२, म.पो.शि.स्नेहा ब.क्र.२११४, पो.उपनिरीक्षक नरसिंह आनलदास व ईतर पोलीस कर्मचारी होते. आम्ही गंगाजमुना परिसरात पेट्रोलींग करीत असतांना संध्याकाळी ७.३० ते ७.४५ च्या दरम्यान एका मस्जीदाजवळ एक महिला सार्वजनीक रस्त्यावर येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांना अश्लील ईशारे करुन व अंग प्रदर्शन करुन देहव्यवसायासाठी बोलविण्याचा प्रयत्न करीत असतांना आम्हाला दिसली. पथकामधील मी व ईतर महिला पोलीस शिपायांनी तिला ताब्यात घेतले. तिला नावगाव विचारले असता तिने तिचे नाव कुसूम राजु केसीया, वय-३० वर्षे, रा. बदनापूर, ग्वालीयर, ह.मु.गंगाजमूना, मुन्नीबाई बिल्डींगमध्ये भाडयाने राहते असे सांगितले. तसेच तिने मुन्नीबाई बिल्डींगमध्ये तिच्या किरायाच्या घरी देहव्यवसाय करते असे सांगितले.

२. सदर महिलेने आपली किरायाची खोली दाखविली. त्याठिकाणी पो.उपनिरीक्षक नरसिंह यांनी पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. तिला ताब्यात घेऊन आम्ही पोलीस स्टेशनला आणले. सदर महिला ज्या ठिकाणी मिळून आली त्याठिकाणापासून जवळ एक मस्जीद आणि देवीचे मंदीर आहे. तपासादरम्यान तपासी अधिकारी यांनी मी सांगितल्याप्रमाणे जवाब नोंदविला. जी महिला आम्हाला त्याठिकाणी मिळाली, न्यायालयासमोरील आरोपी कुसूम राजु केसीया तीच आहे.

**उलट तपास आरोपीतर्फे आरोपींचे विद्वान विधीज्ञ श्री. एन.एल. राऊत यांचेमार्फत**

३. हे म्हणणे खरे आहे की, गंगाजमुना परीसर हे गर्दीचे ठिकाण आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या तपास पथकासोबत कोणत्याही समाजसेविका नव्हत्या. आमच्या पथकात घटनेच्या वेळी सहा.पोलीस उप आयुक्त होते की नाही हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मुन्नीबाईचे पुर्ण नाव काय आहे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यापरिसरात किती मुन्नीबाई राहतात याची मला कल्पना नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जवाबात मंदीर किंवा मस्जीदीचा उल्लेख नाही. घटनास्थळावरुन धार्मीक स्थळ किंवा मंदीर किती दुर आहे याची खात्री करण्यासाठी मोजणी करण्यात आली नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यापरिसरात एक पोलीस चौकी आहे व तिथे नेहमी पोलीस हजर असतात. हे म्हणणे खरे आहे की, सदर महिलेच्या तथकथीत अश्लील हातवारे करण्याबाबत कोणाचीही तक्रार लकडगंज पोलीस स्टेशनला करण्यात आली नाही. घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदारांचे नाव मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर पंचनामा केला नाही म्हणून त्यावरील पंच साक्षीदारांची नावे मला सांगता येणार नाही. तपासादरम्यान माझा जवाब निश्चीत कोणत्यादिवशी नोंदविण्यात आला हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर महिला सार्वजनीक रस्त्यावर अश्लील हातवारे करीत होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यादिवशी डयुटीवर हजर नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**
**फेरतपास – नाही**

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

ANAMIKA DEBASHISH BOSE

Digitally signed by ANAMIKA DEBASHISH BOSE
Date: 2026.01.12 15:11:27 +0530

( **अनामिका दे. बोस** )
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दिनांक १२.०१.२०२६